# प्रेसनोट

दि.९/१२/२०१७

## कोंढवा पोलीस स्टेशन कडील वाहन चोरीबाबतची कामगिरी

दि.०२/१२/२०१७ रोजी कोढवा पोलीस स्टेशनचे भागात मा.पोलीस आयुक्त सो परि.४ पुणे शहर श्री.दिपक साकोरे व सहाय्यक पोलीस आयुक्त सो वानवडी विभाग पुणे श्री.निलेश मोरे यांचे सुचनेवरुन वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.मिलींद गायकवाड व पोलीस निरीक्षक गुन्हे श्री.श्रीकांत शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे शहरातील वाहन चोरीचे गुन्हयांना आळा घालणेकामी पोलीस उप-निरीक्षक श्री.संतोष शिंदे हे तपास पथकातील कर्मचारी यांचे सह एनआयबीएम रोड कोंढवा याठिकाणी वाहन चेकींग करीत असताना १८/३० वा.चे सुंमारास एक काळया रंगाची हिरो होडा स्पेंडर प्रो या मोटर सायकल वरुन एक मुलगा एन.आय.बी.एम.रोडने येत असताना दिसला.त्याचा संशय आल्याने त्यास थांबण्याचा इशारा केला असता तो इशाऱ्याकडे दुर्लक्ष करुन पुढे जावु लागला म्हणुन सोबतच्या स्टाफच्या मदतीने त्यास थोडेसे अंतरावर पाठलाग करुन पकडुन त्याचे नाव व पत्ता विचारता त्याने आपले नाव गुराप्पा उर्फ राजु हनमंत याळगी वय २० वर्षे रा.मुक्ताई मंदीरजवळ नारायणगाव ता.जुन्नर जि.पुणे असे असल्याचे सांगितले.त्यास गाडीचे मालक व कागदपत्रांबाबत विचारणा करता तो असमाधानकारक व उडवा-उडवीची उत्तरे देवु लागला.यावरुन त्याने सदरची गाडी कोठुन तरी चोरुन आणली असावी असा संशय आल्याने त्यांचे कडील हिरो होंडा स्पेडंर प्रो मोटर सायकल नं. एम.एच.१२ जी.यु.८७५ हा जप्त करुन त्यास सीआरपीसी ४१(१)(ड) प्रमाणे ताब्यात घेतले .तसेच सदर गाडीचे इंजीन व चॅसी नंबर वरुन सदर गाडी कोठुन चोरी झाली याबाबत "स्टोलन इन्फो" या वेबसाईट वरुन माहीती घेतली असता सदर गाडीचा नंबर एम.एच. एम.एच.२२ वाय ०४७० असा असुन सदरची मोटर सायकल बाबत विश्रामबाग पो.स्टे.पुणे गु.रजि.नं.५१६/२०१७ भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे गुन्हा नोंद असल्याचे निष्पन्न झाले.

सदर आरोपीकडे अधिक तपास केला असता त्यांने कोंढवा पोलीस स्टेशन पुणे गु.रजि.नं.७३/२०१७ भा.द.वि.कलम ३७९ मधील हिरो होंडा कंपनीची स्प्लेंडर मोटर सायकल नं एम एच ३४ क्यु ७८९१ ही गाडी चोरुन परत सोडल्याचे ठिकाण दाखविल्याने त्यास सदर गुन्हयात अटक करुन त्यांची पोलीस कस्टडी रिमांड घेतली असता सदर आरोपी व त्यांचा साथीदार नामे शंकर देवकुळे रा.उस्मानाबाद असे दोघांनी मिळुन पुणे शहरातील ठिकठिकाणी वाहन चोरी केल्याचे सांगुन ठिकाणे दाखविले.सदर बाबत पुढील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत. १) कोंढवा पोलीस स्टेशन पुणे गु.रजि.नं.७३/२०१७ भा.द.वि.कलम ३७९ २) कोंढवा पोलीस स्टेशन पुणे गु.रजि.नं.१५२/२०१७ भा.द.वि.कलम ३७९ ३) कोंढवा पोलीस स्टेशन पुणे गु.रजि.नं.४७८/२०१७ भा.द.वि.कलम ३७९ ४) खडक पोलीस स्टेशन पुणे गु.रजि.नं.४७८/२०१७ भा.द.वि.कलम ३७९ ५) समर्थ पोलीस स्टेशन पुणे गु.रजि.नं.१३२/२०१७ भा.द.वि.कलम ३७९ ६) विश्रामबाग पोलीस स्टेशन गु.रजि.नं.५१६/२०१७ भा.द.वि.कलम ३७९ ७) हडपसर पोलीस स्टेशन पुणे गु.रजि.नं.६३५/२०१७ भा.द.वि.कलम ३७९ ८) हडपसर पोलीस स्टेशन पुणे गु.रजि.नं.११७९/२०१७ भा.द.वि.कलम ३७९ असे गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले असुन सदर गुन्हयातील ८ मोटर सायकल किंमत अंदाजे १,३०,०००/- रु.चा मुददेमाल हस्तगत करुन गुन्हे उघडकीस आणले आहेत.पुढील तपास पोलीस उप-निरीक्षक श्री.संतोष शिंदे तपास पथक हे करीत आहेत.

सदरची कामगिरी तपास पथकातील सहा.पोलीस फौजदार सुभाष जाधव,पो.हवा.संजय कदम,राजस शेख,पो.ना.संचिन शिंदे,पृथ्वीराज पांडुळे,संजय कंळवे,सुरेद्र कोंळगे,अमीत सांळुखे,पो.शि.दिपक क्षीरसागर,अजीम शेख,अनंत धनगर,जगदीश पाटील व सैफ नदाफ यांनी कामगिरी केली आहे.